साप्ताहिक

# विश्वनायक

Email: vishvanayak94@gmail.com

• संपादक : बिलाल शेख •

VISHVANAYAK

Mo.8686888898






■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ०३ ■ मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 03 ■ Tuesday Dt. 13 January 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4


# बीड महावितरणमध्ये कोट्यवधींचा 'विद्युत' घोटाळा

## चौकशीत दोषी आढळुनही कंत्राटदार व अभियंते मोकाटच!

### भ्रष्ट अधिकाऱ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संरक्षण!

### पुरावे देऊनही अधिकारी कारवाई करीत नसल्याने भ्रष्टाचार बोकाळला

### प्रकरण हायकोर्टात गेले तरी अधिकाऱ्यांना घाम फुटेना




विश्वनायक न्यूज

**बीड महावितरण विभागातील भ्रष्टाचार आता उघड्या अंगाने चव्हाट्यावर आला असून, 'कुंपणानेच शेत खाल्ल्याचा' धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इदगाह सबस्टेशन ते खासबाग दरम्यानची ११ केव्हीची मुख्य वीज वाहिनीच गायब करून ती खुल्या बाजारात विकल्याचा खळबळजनक आरोप सहाय्यक अभियंता आणि जयहिंद एम्पायर या खासगी कंत्राटदारावर करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाची अंतर्गत चौकशी होऊन दोघेही दोषी आढळून आले असतानाही महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून फौजदारी गुन्हा दाखल करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे दोषींना पाठीशी कोण? असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. इदगाह सबस्टेशनमधून खासबाग परिसरात वीजपुरवठा करणारी ११ केव्हीची मोठी मुख्य लाईन ही महावितरणची मौल्यवान सरकारी मालमत्ता होती. मात्र, संबंधित सहाय्यक अभियंता आणि जयहिंद एम्पायरच्या कंत्राटदाराने संगनमत करून ही संपूर्ण लाईन काढून टाकली आणि तिची स्क्रॅप म्हणून विक्री करून लाखोंचा घोटाळा केल्याचा गंभीर आरोप आहे.**

या प्रकारामुळे सरकारी तिजोरीवर थेट दरोडा पडला असून, महावितरणला मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. तरीही चौकशी अहवाल हातात असताना ना निलंबन, ना एफआयआर, अशी संशयास्पद भूमिका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतल्याने भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप बळावला आहे. चौकशी अहवाल असूनही कारवाई होत नसेल, तर हा गुन्हा फक्त दोन व्यक्तींचा नाही, तर संपूर्ण यंत्रणेचा आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. आता प्रश्न एकच उपस्थित झाला आहे की, महावितरणमधील या 'लाईन चोरी' प्रकरणात दोषींवर कधी फौजदारी कारवाई होणार, की हे प्रकरणही फाईलमध्येच गाडले जाणार?

#### हायकोर्टाच्या निकालावरही अधिकाऱ्याचा चुकीचा अहवाल?

अखी लाईन चोरण्याचा हा प्रकार थेट हायकोर्टात दाखल करण्यात आला. उपलब्ध पुरावे तपासून हायकोर्टाने याबाबत आदेश काढीत तक्रारदाराला पोलिसांकडे केस दाखल करण्याचे सांगितले शिवाय जिल्हा कोर्टात जाण्याचीही मुभा दिली. हे प्रकरण पोलिसात गेल्यानंतर पोलिसांनी बीडच्या महावितरण कार्यालयात चौकशी केली त्यावेळी पेठबीड पोलिसांना अहवाल देताना महावितरण मधील एका अधिकाऱ्याने चक्क चुकीची माहिती दिली. अशी चोरी झालीच नसल्याचे त्याने आपल्या पत्रात म्हटले. यामुळे हा अधिकारीच आता गोत्यात आला आहे. जर चोरी झालीच नाही तर मग जी चौकशी समिती नेमली होती तिचा अहवाल चुकीचा आहे का? पुराव्याच्या आधारे कोर्टाने दिलेला निर्णय चुकीचा आहे का ? याच प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई झाली ती कशासाठी? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. यामुळे या सगळ्या अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याचे स्पष्ट होत असून, चुकीचे पत्र देणारा अधिकारी यामध्ये गोत्यात येणार आहे.


#### अहवाल कागदावरच; वरिष्ठ अधिकाऱ्यांचे 'अर्थपूर्ण' मौन?

या प्रकरणाची तक्रार झाल्यानंतर चौकशी समिती नेमण्यात आली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चौकशी अहवालात सहाय्यक अभियंता आणि कंत्राटदार यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. असे असतानाही मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रेमसिंह राजपूत आणि कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे हे अधिकारी संबंधित दोषींना पाठीशी घालत असल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे. या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'आर्थिक देवाणघेवाण' करून या प्रकरणावर पांघरूण घातल्याचा गंभीर संशय बीडच्या जनतेकडून व्यक्त केला जात आहे.

#### पालकमंत्री अजित दादा यांना लक्ष घालण्याची गरज...

महावितरणच्या प्रकरणांमध्ये राज्यभरात गोंधळ उडाला आहे. नुकताच यातील मोठा घोटाळा बाहेर आले असून यात अत्यंत वरिष्ठ अधिकारी गुंतले असल्याचे समोर आले आहे. बीडमध्येही असाच प्रकार घडला असून संपूर्ण साखळी यात कार्यरत आहे. कनिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांनी गुत्तेदाराला सोबत घेऊन मोठा भ्रष्टाचार केला आहे. हे केवळ एक प्रकरण नसून, आणखीही बरीच प्रकरणे घडले असल्याची शक्यता आहे. यामध्ये कोट्यावधीची उलाढाल झाली असल्याची शक्यता असल्याने याची मुळापासून चौकशी होण्याची गरज आहे. राज्य पातळीवर ज्या पद्धतीने चौकशी सुरू होणार आहे त्याच पद्धतीने बीड जिल्ह्यातील महावितरण मधील वरिष्ठ अधिकारी यांची आणि भ्रष्टाचार करणाऱ्या सगळ्याच अधिकारी कर्मचाऱ्यांची मुळातून चौकशी व्हावी अशापेक्षा जनतेतून व्यक्त होत असून, जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले कर्तव्य कठोर अजित दादा पवार यांनी यात लक्ष घालावे अशा पद्धतीचे निवेदन अजितदादा यांना दिले जाणार आहे. अजित दादांनी यात लक्ष घातले तर महाघोटाळा उघडकीस येईल.



#### वरिष्ठ अधिकारीही तेवढेच दोषी; पुरावे देऊनही कारवाई नाही

कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी सोबतच गुत्तेदाराने भ्रष्टाचार केल्याचे समोर आल्यानंतर त्याची पुराव्यासह तक्रार दाखल करण्यात आली. त्याच आधारावर कार्यालयीन चौकशी करण्यात आली. चौकशीत सुद्धा तक्रारीत तथ्य असल्याचे समोर आले आणि अधिकारी दोषी असल्याचा ठपका ठेवण्यात आला. जर अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी होती, मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशी कार्यवाही केली नाही. याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर आणि थेट हायकोर्टात याचिका दाखल केल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून थातूरमातूर कारवाई करण्यात आली. अखी लाईन चोरली असतानाही, केवळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली तसे वरिष्ठ अधिकाऱ्याने कोर्टाला सुद्धा सांगितले आहे. एवढ्या मोठ्या चोरीसाठी फक्त शिस्तभंगाची कारवाई होत असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कारभारावर शंका उत्पन्न होत आहे. त्यानंतरही त्यांच्याकडे विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहेत. मुख्य अभियंता यांच्या कानावर सुद्धा ही बाब घातली आहे, त्यांनी सुद्धा फक्त आश्वासन दिले मात्र पुढे काहीच केले नाही. यामुळे या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी पण दोषी असून ही संपूर्ण साखळीच एकत्र काम करीत असल्याचे दिसत आहे. यामुळेच या अधिकाऱ्यांची सुद्धा चौकशी होण्याची गरज आहे.

#### आता लक्ष थेट मंत्रालयाकडे!

पुराव्यानिशी गुन्हा सिद्ध होऊनही कारवाई होत नसल्याने आता बीडकरांच्या नजरा मंत्रालयाकडे लागल्या आहेत. अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीच आता या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. केवळ कंत्राटदार आणि सहाय्यक अभियंत्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून चालणार नाही, तर पुरावे असूनही कारवाई न करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. सरकारी मालमत्तेची चोरी करणाऱ्यांना अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांचीही गय केली जाऊ नये. संबंधित अधिकाऱ्यांनी अत्यंत गंभीर प्रकार केला असून, ते दोषी आढळले आहेत त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित आहे.

---

# मंजरथ ग्रा.पं.ने काढलेले रक्षा लिलावाचे फर्मान रद्द करा या मागणीसाठी आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मंजरथ ग्रामपंचायतने गोदावरी नदीपात्रात होणाऱ्या रक्षा व्यवसायाचे सरपंच व ग्रामसेवकाने संगणमत्ताने टेंडर काढले असून सदरील टेंडर रद्द करावे अन्यथा गोदावरी नदी पात्रात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा हा व्यवसाय करणाऱ्या मंजरथ येथील ग्रामस्थांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला होता त्याप्रमाणे आंदोलन चालु आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मंजरथ ग्रामपंचायत कार्यालय गोदावरी नदी येथे पात्रातील दशक्रियाविधी (रक्षा) लिलाव काढले आहे. या लिलावामुळे गावातील च पारंपारिक वडिलोपार्जित काम करणाऱ्या लोकांवर उपासमारीची वेळ येत आहे. यामुळे मंजरथ गावची संस्कृती व परंपरा मोडीस येत आहे. यामुळे लोकांची श्रद्धा भावना दुखावल्या जात आहेत व ग्रामस्थ पारंपारिक रक्षा चाळून उपजिविका भागवणाऱ्या लोकांची उपासमार होत आहे.

त्यामुळे हा लिलाव आपण तात्काळ रद्द न केल्यास दि.१२/०१/२०२६ रोजी सकाळी ११ वा. मंजरथ येथील गोदावरी नदी पात्रात जलसमाधी घेण्याचा इशारा तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला होता त्याप्रमाणे जलसमाधी चालु वेळेत काही अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वस्वी जिम्मेदारी ही शासन व प्रशासनानी घेतली. सदरच्या आंदोलनामध्ये भीमराव कदम, नवनाथ चुंबळे, अनिल चुंबळे, अर्जुन जाधव, इसाक बेग, महानंदा कचरे यांचेसह हा व्यवसाय करणाऱ्या अनेक ग्रामस्थांनी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

---

# बीड पोलिसांचा थरारक 'सळसळाट'!

## हर्षद शिंदेच्या मारेकऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

### नवनीत कॉवत यांच्या 'स्पेशल टीम'चा सर्जिकल स्ट्राईक! हर्षद शिंदे हत्येचा छडा लावत आरोपीला केलं जेरबंद



**बीड । प्रतिनिधी**

शहरात दिवसाढवळ्या गोळ्या झाडून आणि धारदार शस्त्राने वार करून करण्यात आलेल्या हर्षद शिंदे हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि शिवाजी नगर पोलिसांनी संयुक्त रित्या धाडसी कारवाई करत फरार आरोपीला जेरबंद केले. गेल्या ६ जानेवारी रोजी दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास अंकुश नगर परिसरात थरार घडला होता. नगरपालिकेचा कंत्राटी कर्मचारी असलेला हर्षद शिंदे (वय ३५) याच्यावर विशाल सुर्यवंशी नामक हल्लेखोराने पाळत ठेवून गोळ्या झाडल्या आणि त्यानंतर धारदार शस्त्राने सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात हर्षदचा जागीच मृत्यू झाला होता. वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ माजली होती. हत्येच्या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. त्यानंतर घटनेच्या सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत होते.

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस प्रशासनाने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि शिवाजी नगर पोलीसांच्या तब्बल ५ दिवसांच्या शोधानंतर दि.११ जानेवारी रोजी सायंकाळी ८:३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी सापळा रचला.



अत्यंत शिताफीने पोलिसांनी कळम-केज रोडवरून आरोपीला गाठले आणि त्याच्या मुसक्या आवळल्या. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. प्रत्यक्ष मैदानात उतरून तपासाची चक्रे फिरवणाऱ्या या टीममध्ये खालील अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पीएसआय सुशांत सुतळे, मनोज वाघ, राहुल शिंदे, अर्जुन यादव, मनोज परजने, अशफाक सय्यद, नितीन वडमारे, सिद्धेश्वर मांजरे यासोबतच स्थानिक गुन्हे शाखा व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या इतर कर्मचाऱ्यांनी या कारवाईत मोलाची भूमिका बजावली.

#### दहशत माजवणाऱ्यांना पोलिसांचा इशारा

शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांना या कारवाईमुळे मोठा दणका बसला आहे. भरदिवसा हत्या करून पोलिसांना आव्हान देणाऱ्या आरोपीला जेरबंद केल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. गुन्हेगार कितीही हुशार असला तरी कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाही, हे या कारवाईने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, या हत्येमागे नक्की काय कारण होते? यात अजून कोणाचे हात आहेत का? याचा सखोल तपास आता शिवाजी नगर पोलीस करत आहेत.

---

# बीडचा दारुबंदी विभाग बनला हफ्ता वसुली केंद्र

## चौसाळा शहरात केमिकल युक्त हातभट्टी दारुला दिली परवानगी?

### देशमुख साहेबाचा कारभार मला पहा आणी पानफुल व्हा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा शहरातील बसस्थानकानजीक केमिकल युक्त हातभट्टी दारु ही खुलेआमपणे विकली जात असुन गेल्या पाच वर्षापासून याठिकाणी ही केमिकल युक्त हातभट्टी दारु विकली जाते पण याच्यावरती कुठल्याही प्रकारची कारवाई बीड चा दारू बंदी विभाग करताना दिसुन येत नाही. याविषयी विविध वृत्तपत्रातुन वृत्त प्रकाशित होवुन देखील झोपी गेलेल्या बीड च्या दारु बंदी विभागाचे अधिकारी हे फक्त पैसा फेको तमाशा देखो या पध्दतीत वागताना दिसुन येत आहेत.

चौसाळा बसस्थानका शेजारी विक्री होणारी केमिकल युक्त हातभट्टी दारु ही खुलेआमपणे विकली जाते पहाटे पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत हे दुकान खुलेआमपणे सुरु असते दिवसभर याठिकाणी तळीरामाची गर्दी मोठ्या प्रमाणात पाहीला मिळते अवाच्र्शय भाषा वापरणे, रस्तयावर लघु शंका करणे असे प्रकार या चौसाळा बसस्थानक परिसरात पाहीला मिळतात याठिकाणी प्रवास करणाऱ्या महीला प्रवासी वर्गाला याचा फार मोठा त्रास सहन करावा लागत असुन याबाबतीत बीडच्या दारु बंदी विभागाला सर्व काही माहीत असतानाही या दुकानाविषयी कारवाई का होत नाही असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. महीन्याकाठी येवुन फक्त हफ्ता वसुली करत आपले पोट भरण्याचे काम हा दारू बंदी विभाग करताना दिसुन येत आहे.








# महिलाओं को मिलेगा ५ लाख का इंटरेस्ट फ्री लोन

महायुति ने बृहन्मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन चुनावों (बीएमसी चुनाव) के बीच में अपना मैनिफेस्टो जारी किया है। इस मैनिफेस्टो में मराठी भाषा और मराठी लोगों के विकास पर खास जोर दिया गया है। महायुति ने महिलाओं को ५ लाख रुपये तक का बिना ब्याज का लोन देने का बड़ा वादा किया है, ताकि महिला वोटर्स को अपनी ओर खींचा जा सके। इसके साथ ही बेस्ट बसों में महिलाओं को ५० परसेंट की छूट, कचरा-मुक्त और प्रदूषण-मुक्त मुंबई, साथ ही रोहिंग्या और बांग्लादेशी-मुक्त मुंबई का भी वादा किया गया है। मैनिफेस्टो में मराठी लोगों के लिए सस्ते घर बनाने की योजना का वादा भी शामिल है। महायुति ने मैनिफेस्टो में मराठी के मुद्दे को सेंटर में रखा गया है। महायुति ने मराठी भाषा और मराठी लोगों के लिए कई स्कीम लागू करने का वादा किया है। दरअसल जब से ठाकरे भाइयों ने मराठी का मुद्दा उठाया है, महायुति उन्हें इसी मुद्दे पर घेरने की कोशिश कर रही है। विधानसभा चुनाव में गेम-चेंजर साबित हुई 'लाडकी बहिन योजना' की तरह महायुति ने मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन में भी महिलाओं के वोटों को ध्यान में रखते हुए एक बड़ा वादा किया है। महायुति ने महिलाओं को ५ लाख रुपये तक का बिना ब्याज का लोन देने का ऐलान किया है। यह ऐलान महिला वोटरों को ध्यान में रखकर किया गया है। इससे पहले प्रवीण दारकेकर की अगुवाई में मुंबई बैंक के जरिए मुंबई की लाडकी बहिनों को १ लाख रुपये तक का बिना ब्याज का लोन देने का एक एक्सपेरिमेंट किया गया था। उस समय कुछ महिलाओं ने अच्छा बिजनेस शुरू किया था। अब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने ऐलान किया कि मुंबई की लाडकी बहिनों को म्युनिसिपल कॉर्पोरेशन के जरिए ५ लाख रुपये तक का बिना ब्याज का लोन दिया जाएगा। मुख्यमंत्री देवेंद्र फड़नवीस ने बृहन्मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन चुनाव के लिए 'इगझ-महायुति का वादा' जारी किया। इस मौके पर डिप्टी चीफ मिनिस्टर एकनाथ शिंदे, यूनियन मिनिस्टर ऑफ स्टेट रामदास अठावले, बीजेपी नेशनल जनरल सेक्रेटरी विनोद तावड़े, बीजेपी मुंबई प्रेसिडेंट और विधायक अमित साटम, बीजेपी-महायुति के बड़े नेता और दूसरे बड़े लोग मौजूद थे। फडणवीस ने कहा कि मिडिल-क्लास परिवारों की महिलाओं को ५ लाख रुपये तक के बिना ब्याज वाले लोन का भरोसा दिया गया है। बिना ब्याज वाले लोन से महिलाएं अपना खुद का रोजगार बना सकती हैं। हम उनके सफर को सेल्फ-एम्प्लॉयमेंट से खुशहाली और प्यारी बहनों से करोड़पति दीदी तक ले जाएंगे। महिलाओं को इएडढ ट्रैवल पर ५० परसेंट डिस्काउंट दरअसल मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन चुनाव में महिलाओं के वोट बहुत अहम होंगे। खासकर इस बात की बहुत संभावना है कि मिडिल-क्लास परिवारों की महिलाओं को ५ लाख रुपये तक के बिना ब्याज वाले लोन का वादा उनका मन बदल देगा। इसलिए, ऐसी चर्चा है कि महायुति ने कोई बड़ी चाल चली है। महिलाओं को इएडढ ट्रैवल पर ५० परसेंट डिस्काउंट मिलेगा। यह महायुति का बड़ा ऐलान है। इसके अलावा रेलवे स्टेशन, बस स्टॉप, पार्क और हॉस्पिटल वगैरह में सिक्योरिटी बढ़ाने का भी भरोसा दिया गया है। इसके साथ ही कचरा-फ्री और पॉल्यूशन-फ्री मुंबई का भी वादा किया है। महायुति ने रोहिंग्या और बांग्लादेशी-फ्री मुंबई का भी वादा किया है। इसी तरह, महायुति ने भरोसा दिया है कि मराठी लोगों को सस्ते घर देने के लिए प्लान बनाए जाएंगे।

# स्वीकृत नगरसेवक पद 'सदका थोड़ा भूत बहोत' प्रमाणे झाले : एस.एम.युसूफ

**बीड । प्रतिनिधी**

आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर राज्यात नगरपालिकांची निवडणूक एकदाची झाली तशी ती बीड नगर परिषदेसाठी ही झाली. बीड शहराच्या २६ प्रभागातील ५२ उमेदवारांना मतदार राजाने नगरसेवक म्हणून नगरपालिकेत पाठविले मात्र निवडून आलेल्या उमेदवारांच्या संख्येपेक्षा कितीतरी पटीने जास्त उमेदवार पडले. आता या पडलेल्यांमधून अनेक जण स्वीकृत नगरसेवक पदी निवड व्हावी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी माध्यमातून पत्रक प्रपंच करू लागले आहेत. हे पाहता 'सदका थोड़ा भूत बहोत' या हिंदीतील म्हणीची प्रकर्षाने आठवण येऊ लागली आहे. असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकार नमूद केले आहे की, वास्तविक पाहता स्वीकृत नगरसेवक पद हे समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व नोंद घेण्याजोगे कार्य करीत असलेल्या चांगल्या व्यक्तींना मग ते पत्रकारिता, शिक्षण, न्याय, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, वैद्यकीय, अभियंता, व्यवसाय आदी क्षेत्रातून घेणे संवैधानिक दृष्ट्या आवश्यक असूनही या बाबीकडे राजकीय मंडळी व राजकीय पक्षांकडून बगल दिली जाते आणि निवडणुकीत पडलेल्यांनाच पुन्हा मागच्या दाराने स्वीकृत नगरसेवक करून मतदारांच्या माथी मारले जाते, हे कुठेतरी थांबायला हवे. किंबहुना या विरोधात मतदार राजानेच आवाज बुलंद करणे व अशा पडेल चेहऱ्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून नगरपालिकेत प्रवेश मिळणार नाही याकरिता जन आंदोलन उभारणे गरजेचे झाले आहे. कारण स्वीकृत नगरसेवक पद वर उल्लेख केलेल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी असते न की सार्वत्रिक निवडणुकीत पडलेल्यांसाठी. तरीही निवडणुकीचे निकाल लागल्यापासून ते आतापर्यंत अनेक पडेल चेहरे स्वीकृत नगरसेवक पद स्वतःच्या पदरात पाडून घेण्यासाठी पत्रकबाज क्लुप्त्या करू लागले आहेत.

बीड नगरपालिकेचा विचार केला असता निवडून आलेल्या ५२ नगरसेवकांवर फक्त ५ स्वीकृत नगरसेवक निवडल्या जाऊ शकते आणि ते पाचही पद हे वर उल्लेख केलेल्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मानाने बोलावून दिले गेले पाहिजे परंतु असे होताना दिसत नाही. उलट पडलेल्यांनाच स्वीकृत नगरसेवक पद देण्यात यावे अशी पांचट मागणी निकाल लागल्यापासून ते आजपर्यंत सारखी करण्यात येत आहे. यावरून 'सदका थोड़ा भूत बहोत' या हिंदीतील म्हणीची प्रकर्षाने आठवण येऊ लागली आहे. असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

# स्वीकृत नगरसेवक म्हणजे खिरापत नव्हे : डॉ. सतीश साळुंके

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील बीड सह गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, धारूर, परळी या नगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून त्या त्या शहरातील क्रीडा, उद्योग, शिक्षण, पत्रकारिता, न्यायपालिका, संस्कृती, इतिहास, साहित्य व समाजसेवक या क्षेत्रातील मान्यवर नियुक्त करावे त्यामुळे त्या शहराच्या सर्वांगीण विकासाला खऱ्या अर्थाने हातभार लागेल. स्वीकृत नगरसेवक म्हणजे राजकीय पक्षांनी वाटलेल्या रेवड्या आणि खिरापत नव्हे. या विषयी शासनाने काही नियम निर्धारित केलेले आहेत त्याचे अनुपालन व्हायला हवे. या संदर्भात आपण जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार असून न्यायालयात रीट दाखल करणार असल्याची माहिती 'सारांश' या पॉडकास्ट चॅनेलचे मुख्य संपादक डॉ. सतीश साळुंके यांनी दिली.



सर्वच नगरपालिकांमधून सध्या स्वीकृत नगरसेवकासाठी स्पर्धा सुरू झाली आहे. राजकीय डजस्टमेंट करण्यासाठी दिलेल्या आश्वासनांमुळे स्वीकृत नगरसेवक विविध राजकीय पक्ष निवडतात असा अनुभव आहे. मात्र स्वीकृत नगरसेवक म्हणून त्या त्या शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना जर नगरपालिकेत स्थान दिलं तर त्या शहराच्या सर्वांगीण विकासाला मदत होईल. या संदर्भात समाजातील सर्व स्तरातून आवाज उठवण्याची आवश्यकता असून जनतेने निवडून दिलेल्या मतांवर जनतेचाच अधिकार आहे. त्यासाठी या निमित्ताने चांगली माणसे नगरपालिकेत जाणे आवश्यक आहे. बीड नगरपालिकेसाठी पत्रकारितेच्या क्षेत्रातून अशोक देशमुख शिक्षण व न्याय क्षेत्रातून ड. कालिदासराव थिगळे, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातून डॉ. दीपाताई क्षीरसागर, राजकीय क्षेत्रातून कॉ. नामदेव चव्हाण, सामाजिक क्षेत्रातून डॉ. गणेश ढवळे, कीडा क्षेत्रातून राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडू अविनाश बारगजे तर वैद्यकीय क्षेत्रातून प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. इलीयासखान यांच्यासारखे मान्यवर स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात नगरपालिकेत आली तर महाराष्ट्रातील ते एक अद्वितीय उदाहरण ठरेल व नगरपालिकेच्या व्यवस्थापनावर एक नैतिक अधिकार असेल तसेच बीडच्या सर्वच राजकीय पक्षांची प्रतिमा उंचावेल. त्या त्या भागातील नेत्यांनीही स्वीकृत नगरसेवकांचा गांभीर्याने विचार करून आपण जनतेचे बांधिल आहोत हे दाखवून द्यावे. निवडणुक हे सज्जनांचे क्षेत्र नसलं तरी स्वीकृत नगरसेवकांवर अशा लोकांचा निश्चित अधिकार असतो. असेही प्रतिपादन डॉ. सतीश साळुंके यांनी केले.

# फारुख पटेल यांना उपनगराध्यक्ष करा : नवीद इनामदार

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या यशासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे गटनेते फारुख पटेल यांना उपनगराध्यक्षपद देण्यात यावे, अशी मागणी नवीद इनामदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.



इनामदार यांनी सांगितले की, फारुख पटेल यांनी निवडणूक काळात स्वतःच्या वॉर्डाचा किंवा स्वतःचा प्रचार न करता जास्तीत जास्त नगरसेवक आणि नगराध्यक्ष कसे निवडून येतील यासाठी नियोजनबद्ध प्रचार केला. रात्रंदिवस परिश्रम घेऊन त्यांनी पक्षाच्या उमेदवारांसाठी काम केले.फारुख पटेल हे जात-धर्म न पाहता सर्वसामान्यांच्या सेवेत कायम उपलब्ध असणारे नेते म्हणून ओळखले जातात. यापूर्वीही त्यांनी उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली असून, त्यांना प्रशासकीय कामकाजाचा मोठा अनुभव आहे, असेही इनामदार यांनी नमूद केले.

अल्पसंख्याक समाजामध्ये फारुख पटेल यांची चांगली प्रतिमा असून, या समाजाने राष्ट्रवादी काँग्रेसवर जो विश्वास दाखवला आहे, त्या विश्वासाला न्याय देण्यासाठी पक्षाने फारुख पटेल यांना उपनगराध्यक्षपदाची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. निवडणुकीतील यशामागे फारुख पटेल यांचे नियोजन, प्रचार आणि संघटनात्मक कौशल्य महत्त्वाचे ठरले असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उपनगराध्यक्षपद देण्यात यावे, अशी ठाम भूमिका नवीद इनामदार यांनी प्रसिद्धीपत्रकात मांडली आहे.




आमचे बंधू, दै,सिटीजन चे संपादक शेख मुजीब भैय्या यांना नगरपालिका विजयाच्या शुभेच्छा देताना वसिम लाला, जावेद भाऊ बागवान, राहुल मेंबर शिनगारे, शेख आफन.

# बीड तालुक्यात घरकुल अभियंत्याची कमाल

## घरकुल लाभार्त्यांची धमाल, घरे न बांधताच बिले उचलली चौकशी करून कारवाई करा -जया लांडगे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अनेक गावात रमाई घरकुल योजना आणि पंतप्रधान घरकुल योजनेत मोठया प्रमाणात लाखो रुपयांचा घोटाळा झाला असून हा घोटाळा घरकुल लाभार्थी व बीड पंचायत समितीचे अभियंता यांच्या संगणामताने झाला असून या घोटाळ्याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी आजाद क्रांती सेनेच्या पदाधिकारी जया लांडगे यांनी मागणी केली आहे.

सविस्तर असे कि,बीड तालुक्यातील अनेक लाभार्त्यांना रमाई आवास योजने अंतर्गत आणि पंतप्रधान घरकुल योजने अंतर्गत सन २०२४/२०२५ या वर्षात घरकुल मंजूर झाले मात्र कोणत्याही प्रकारचे घरकुल बांधकाम न करताच घरकुल योजनेचा निधी हा लाभार्थी यांनी अभियंता यांना हाताशी धरून उचलून शासनाची दिशाभूल केली असून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. तसेच घरकुल योजनेत अभियंत्याने लाभारतीयकडून आर्थिक तडजोड करून लाभार्थी यांनी कुठलेही बांधकाम केले नसताना घरकुल लाभार्थ्यांला निधी कसा उपलब्ध करून दिला असा प्रश्न निर्माण होत आहे. तेव्हा अभियंत्यांची कमाल आणि लाभार्थ्यांची धमाल अशी बनवाबनवी करून शासनाची दिशाभूल अभियांत्यांनी केली आहे. सदर प्रकरणी संबंधित विभागाने चौकशी करून दोषींवर फौंजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी आजाद क्रांती सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विलास नाना भिसे, बीड तालुका अध्यक्ष जया लांडगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सुरज जावळे यांची एकमताने निवड

**पाटोदा । प्रतिनिधी**

संपूर्ण देशाला सामाजिक न्याय, समता व बंधुतेचा संदेश देणारे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सुरज जावळे यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीमुळे आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्ते, युवक आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या निवडीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात सागर आप्पा धस, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव तसेच नगरसेवक प्रकाश जावळे यांनी सुरज जावळे यांना शुभेच्छा देत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. सुरज जावळे यांच्या नेतृत्वाखाली यंदाचा जयंती उत्सव अधिक नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी स्वरूपात साजरा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास आंबेडकरवादी कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीमुळे येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव अधिक भव्य, शिस्तबद्ध आणि समाजप्रबोधन करणारा ठरेल, असा विश्वास सर्व स्तरांतून व्यक्त केला जात आहे.

# सरकारी दवाखाना रोड, गणेश नगर परिसरात स्ट्रीट लाईट सुरू; नागरिकांना दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

येथील जुने एसपी ऑफिस समोरील रस्ता तसेच सरकारी दवाखाना रोडवरील खांब्यांवर नुकतेच नवीन स्ट्रीट लाईट बसवण्यात आले आहेत. या परिसरात दिवसाढवळ्या मद्यपी खुलेआम दारू पित बसत असल्याचे चित्र दिसून येत होते. विशेषतः संगम हॉलच्या भिंतीलगत मद्यपींचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले होते.



या बाबीची दखल घेत नगरसेवक फारूक पटेल व शेख बब्बू यांनी संबंधित विभागाशी समन्वय साधून या भागातील स्ट्रीट लाईट तातडीने सुरू करून घेतल्या. यावेळी त्यांच्यासोबत समाजसेवक शेख फईम व शेख सरफराज उपस्थित होते. स्ट्रीट लाईट सुरू झाल्यामुळे परिसरात प्रकाशमान वाढून नागरिकांना दिलासा मिळाला असून, असामाजिक तत्वांवरही आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जि.प.प्रा.शाळा वैजाळा ठरली पाटोदा तालुक्यातील आदर्श शाळा

**पाटोदा । प्रतिनिधी**




पाटोदा येथे पि.व्हि.पी. कॉलेज पाटोदा येथे तालुकास्तरीय समूहीक नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या मध्ये तालुक्यातील वैजाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. शाळेला गावाचा आधार गावाला शाळेचा अभिमान आसावा असे काम शाळेने केलेले आहे. या स्पर्धांमध्ये अनेक शाळा सहभागी झाले होत्या.

या मध्ये या सामुहिक नृत्य स्पर्धात जि.प.प्रा.शाळा वैजाळा पाटोदा तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून, अभिमान वाटून, तालुक्यातून सर्व स्तरातून कौतुक होऊ लागले आहे. आणि या शाळेची निवड जिल्हास्तरीय स्पर्धासाठी निवड झाली. मार्गदर्शक गट.शि.अधिकारी गव्हाणे साहेब, विस्तार अधिकारी रहिंज सर, दासखेड केंद्राचे केंद्र प्रमुख धांडे सर, केंद्रीय मुख्याध्यापक कोकाटे सर, शाळेचे मुख्याध्यापक वाघिरे सर आणि मार्गदर्शका अष्टपैलू व्यक्तिमत्व सुतार मॅडम चे आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शाळेच्या कामगिरी बद्दल वैजाळा गावातील सर्व समस्त नागरीक यांनी शुभेच्छा देऊन पुढील स्पर्धा साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आत्माराम वाव्हळ यांच्या शिक्षण व पत्रकारितेतील योगदानाची दखल

**बीड । प्रतिनिधी**

दर्पण दिनाचे औचित्य साधून लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'लोकरत्न पुरस्कार' पत्रकार तथा बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांना मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दर्पण दिनी बीड शहरातील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित भव्य-दिव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल आत्माराम वाव्हळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दर वर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. याच अनुषंगाने शिक्षण, समाजसेवा व पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्यपूर्ण आणि संघर्षमय योगदान देणाऱ्या श्री आत्माराम वाव्हळ यांची या वर्षी लोक रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. राज्यातील विना अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासह



विविध प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत असताना, पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे. बीड तालुक्यातील शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात ते कार्यरत आहेत. आता पर्यंत त्यांना आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक, तसेच आदर्श पत्रकार व संपादक अशा विविध पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. या वर्षीचा मानाचा समजला जाणारा लोक रत्न पुरस्कार मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता एका भव्य कार्यक्रमात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, बीड नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडशे, पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारोती खेडकर, प्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. रमेश घोडके, डॉ उर्मिला घोडके, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल, मयुरी बांगर, निलाफर शेख मॅडम, तसेच प्रतापराव साळुंके, नवनाथ अण्णा शिराळे आणि भागवत वैद्य, यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करून त्यांच्या गौरव करण्यात आला.

# ११ एकरात ७० लाखांचे उत्पन्न, राजकारण सोडून शेतीकडे वळलेल्या
# संत्रा उत्पादक माजी सभापती संतोष गुंड यांची यशोगाथा

**कडा । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील बीड व पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्या नगर या दोन जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील शेतकरी व आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती संतोष गुंड यांनी ११ एकर संत्राच्या बाग अक्षरशः सोन्यासारखी पिवळी करीत फुलवली आहे. यातून लाखों रुपयांचे उत्पन्न निघाले असुन, उच्च शिक्षित आणि माजी सभापती संतोष गुंड यांची यशोगाथा जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांसाठी खरोखरच प्रेरणादायी आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मराठवाडा हा दुष्काळी भाग समजला जातो, त्यातली-त्यात बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका हा तर सर्वाधिक दुष्काळी म्हणून याकडे पाहिले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना ऊस तोडणी कामगार पुरवणारा तालुका म्हणून आष्टीची महाराष्ट्रात ओळख आहे.

संतोष गुंड हे मूळचे वाघळूज येथील. वाघळूज पासून काही अंतरावर अंभोरा हे गाव आहे. संतोष गुंड यांची अंभोरा येथे शेती असून त्यांचे मेहुणे काशिनाथ गिर्हे हे दोघांत शेती करतात त्या ठिकाणी ११ एकर क्षेत्रावर संत्रा बाग, तीन एकर पिंक पेरू व चार एकर सिताफळ अशी वेगवेगळी फळबाग आहे. पिंक पेरु बागेतून थोडाफार फायदा झाला परंतु सिताफळाची बाग मात्र अक्षरशः तोट्यात गेली यापुढे कोणत्याही शेतकऱ्याने सिताफळ लागवड करू नये असा सल्ला संतोष गुंड यांनी केले. तर ११ एकर क्षेत्रावर असलेल्या संत्रा बागेतून मात्र त्यांना चांगलीच लॉटरी लागली आहे. माजी सभापती राहिलेले संतोष गुंड यांनी राजकारणाच्या चढउतारांपासून चार हात दूर राहत आपले संपूर्ण लक्ष शेती व्यवसायाकडे वळवले असून, त्यांच्या या निर्णयाने आज अनेकांना प्रेरणा देणारी यशोगाथा आकाराला आली आहे. अंभोरा येथील सर्वसाधारण दर्जाच्या जमिनीत १२ बाय १५ फुटांवर चार वर्षांपूर्वी ११ एकर क्षेत्रात त्यांनी एकूण २३०० संत्र्याची झाडे लावली. यामधील १३०० झाडांना यंदा मुबलक प्रमाणात फळधारणा झाली असून इतर झाडांना कमी प्रमाणात फळे आली आहेत, झाडे पिवळ्या सोनेरी रंगाच्या संत्राने जणू नाहुन निघाली आहेत. योग्य मशागत, पाणी व्यवस्थापन,शेणखताचा योग्य मात्रा आणि रोगनियंत्रणावर दिलेले विशेष लक्ष यामुळे ही बाग यशस्वी झाली आहे. संतोष गुंड यांचे मते राजकारणात माणूस माणसाला फसवतो, पण शेती म्हणजे काळी आई कधीच धोका देत नाही. शेतकऱ्यांनी जर मनापासून तिची सेवा केली, तर समृद्धी नक्कीच पदरात पडते.

संतोष गुंड हे एम. एस्सी. बी. एड. असे उच्च शिक्षित असुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत सेंद्रिय शेती करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. अकरा एकर बागेतील संत्रा ५२ रुपये किलो प्रमाणे जाग्यावरच व्यवहार झाला आहे. संतोष गुंड यांना विकास धायगुडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळते. संत्रा लागवड करण्यापुर्वी आष्टीचे तत्कालीन कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. एका झाडाला साडेतीनशे ते साडेचारशे फळे आहेत. फळांच्या ओझ्याने झाडे मोडू नयेत म्हणून एकुण आठ हजार बांबू लावुन झाडांना आधार दिला आहे. दोन एकरात शेततलाव असुन टो सिस्टीमने ड्रीपव्दारे पाणीपुरवठा केला जातो. सव्वा दोन लाख रुपये शेणखताचा खर्च झाला आहे. फळधारणा झाल्यापासून आतापर्यंत साडेतीन लाख खर्च झाल्याचे संतोष गुंड यांनी सांगितले. आतापर्यंत १० पिकअप माल विक्री झाला आहे. अजुनही प्रचंड फळे लगडलेली आहेत. संत्र्याची बाग पाहण्यासाठी परिसरातील शेतकरी भेट देत असून, आधुनिक व शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन घेत आहेत. संतोष गुंड यांची ही वाटचाल केवळ यशस्वी शेतकऱ्याची कथा नसून, राजकारणात अपयश आले तरी शेतीच्या माध्यमातून नवे भविष्य घडवता येते याचा ठोस संदेश देणारी प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांच्या उदाहरणातून तरुणांनी आणि राजकारणात निराश झालेल्यांनी शेतीकडे आशेने पाहावे, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

**टो सिस्टीमने ड्रीपव्दारे पाणीपुरवठा**

फळबागेसाठी दोन एकरांवर शेत तलाव आहे. विशेष म्हणजे शेतीला पाणी देण्यासाठी सात लाख रुपये खर्च करून संतोष गुंड यांनी अटो सिस्टिम वापरून ड्रीपव्दारे पाणी देण्याची व्यवस्था केली आहे. फिल्टर प्लांटव्दारे टो सिस्टीमने पाणी दिले जाते. शेततलावातुन पाणी फिल्टर मध्ये घेतले जाते. फिल्टर पासून झाडांना पाणी देण्यासाठी सहा पीव्हीसी पाईपची व्यवस्था करण्यात आली आहे. एकुण तीन ही फळबागांना पाणी देण्यासाठी वेगवेगळ्या पाईपची क्षेत्रानुसार सोय केली आहे. समजा पहिल्या ५०० झाडांना ४ हजार लिटर पाणी दयायचे असल्यास टो सिस्टिमला ४ हजारची लिटरची कमांड द्यायची. जरी विज पुरवठा मध्ये खंडीत झाला तरी पुन्हा सुरळीत झाल्यावर दिलेल्या कमांड प्रमाणे पाणी पुरवठा होतो. औषधे देखील त्याच ठिकाणाहुन सोडता येतात. त्यामुळे पाणी व्यवस्थापन चोख होते.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा येथे बाल आनंद मेळावा उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील सात्रा येथे जि.प.प्रा.शाळा सात्रा व हनुमान नगर वस्ती यांच्या वतीने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विषयी सविस्तर माहिती अशी की, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि शालेय जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा (हनुमान नगर वस्ती) येथे 'बाल आनंद मेळाव्याचे' भव्य आयोजन करण्यात आले होते.

हा सोहळा आज, शनिवार दि.१० जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला. या मेळाव्याचा उद्देशच ए-ठछ -छऊ डए-ठछ' म्हणजे कमवा आणि शिका तसेच मुलांना चलनी नोटांची माहिती व्हावी, व्यवहार ज्ञान कळावे तसेच आपले आई वडीलांच्या कष्टा बाबत मुलांना जान व्हावी हा होता. या आनंदोत्सवामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विक्री साठी फळे, भाजीपाला, खेळणे, वेगवेगळे खाद्य पदार्थ बनवऊन विक्रीसाठी आणले होते. हा सोहळा केंद्राचे केंद्रप्रमुख शेख, केंद्रीय मुख्याध्यापक मोटे, आंधळे, गायकवाड, नवले, दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष पालक व सर्व गावकरी यांच्या उपस्थितीत हा बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## बस स्थानकामध्ये दाखल झालेला चोरीचा गुन्हा माजलगाव शहर पोलीसांनी केला उघड

**माजलगाव । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.५ जानेवारी २०२६ रोजी फिर्यादी नामे कौशल्या शंकर चोले रा. खडकी ता. वडवणी जि.बीड यांनी पो. स्टे माजलगाव शहर येथे फिर्याद दिली की, त्यांचे नविन बस स्थानक माजलगाव येथे बस मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसुत्र चोरुन नेले आहे. त्यावरुन पो.स्टे. गुरनं ०४/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा तपास पो.ह.६७ गुरखुदे हे करीत आहेत.

पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथील नविन बस स्थानक माजलगाव येथे वारंवार होत असलेल्या चोऱ्यांचे अनुषंगाने गुन्हे शोध पथक यांनी सापळा रचुन चोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका संशयीत महीलेस बस स्थानाकामध्ये येण्याचे कारण विचारले असता तीने उडवा उडवीची उत्तरे दिल्याने तीस पोलीस स्टेशन येथे आणुन तीचेकडे सखोल तपास केला असता तीने वरील गुन्हा केल्याची कबुली सदर गुन्ह्यातील मुद्देमाल काढुन दिल्याने तो जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, ऋषीकेश शिंदे, उपविभाग अंबाजोगाई अति. पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह राहुल गुरखुदे, पोह अस्सलम शेख, किशोर जाधव मपोना रिझवान सय्यद, पोअं महेश चव्हाण यांनी केलेली आहे.

## राष्ट्रवादीचे वैद्यकीय सेल प्रदेश सचिव भाऊसाहेब ढोणे काँग्रेसमध्ये दाखल



**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वैद्यकीय सेलचे प्रदेश सचिव भाऊसाहेब ढोणे यांनी दोन दिवसांपूर्वी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर काल त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला. खासदार रजनी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे सांगण्यात येते. युवा नेते आदित्य पाटील तसेच जिल्हा अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेशामुळे काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला, विशेषतः वैद्यकीय सेलला, नवसंजीवनी मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## बीडच्या पठाणची राज्यात चर्चा
### नांदेड येथे झालेल्या थाई बॉक्सिंग राज्य स्पर्धेत बीडच्या अबरार पठाणची सुवर्ण कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**




नांदेड येथे लोकमत असोसिएशन लोकमत महा गेम्सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित थाई बॉक्सिंग महाराष्ट्र राज्य असोसिएशन कप २०२६ अंतर्गत १९ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या अबरार मुसाखान पठाण याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णयश मिळवले.

राज्यभरातून आलेल्या नामवंत खेळाडूंना पराभूत करत अबरारने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे बीड जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर उज्ज्वल झाले असून, त्याच्या महाविद्यालयालाही मोठा गौरव प्राप्त झाला आहे.अबरार पठाण हा मिलिया अध्यापक विद्यालयाचा विद्यार्थी असून, त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयातील शिक्षकवर्ग, सहकारी विद्यार्थी तसेच क्रीडाप्रेमींनी त्याचे अभिनंदन केले आहे. भविष्यात तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या यशामुळे बीड जिल्ह्यातील युवकांना क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली असून, अबरार पठाण हा अनेकांसाठी आदर्श ठरत आहे.

## अंशराशिकरण व उपदानाबाबत सचिवांशी सकारात्मक चर्चा : जाधवर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्तीनंतरचे अंश राशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ एप्रिल २०२४ पासून प्रलंबित आहेत. ह्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक समन्वय समिती गठीत करण्यात आली असून समितीमध्ये कास्ट्राईब जनरल संघ, महाराष्ट्र शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघटना, सेवानिवृत्त शिक्षक संघटना, प्राथमिक शिक्षक संघ यांचा समावेश आहे. सेवानिवृत्त शिक्षक समन्वय समितीने शिक्षकांचे आर्थिक लाभ जानेवारी अखेर मिळावेत नसता आमरण उपोषण करण्याचा लेखी इशारा निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटून वित्त सचिव, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक पुणे यांना दिलेला आहे.



निवेदनाच्या प्रती पालकमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार, नामदार पंकजाताई मुंडे, सर्व विधानसभा सदस्य यांना दिलेल्या आहेत. दि.८ जानेवारी रोजी समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे जाऊन मंत्रालयामध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अवर सचिव वित्त विभागाचे अवर सचिव यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले व चर्चा केलेली आहे तसेच पुणे येथील शिक्षण आयुक्त व शिक्षणास संचालक प्राथमिक येथील संबंधित अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली. मंत्रालय प्रशासन व आयुक्तालय तसेच शिक्षण संचनालय प्रशासनाने आमरण उपोषणाची व निवेदनाची गंभी गंभीर घेऊन तातडीने कार्यवाही सुरू केली असून जानेवारी महिन्याच्या बजेटमध्ये तरतूद करण्याची निःसंधीग्वाही दिली. जर जानेवारीच्या बजेट तरतुदीमध्ये अंश राशीकरण व उपदानासाठी वित्त तरतूद प्राप्त झाली नाही तर आमरण उपोषण अटळ असल्याचे महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्तशिक्षक समन्वय समितीकडून शासनास व प्रशासनात कळविण्यात आलेले आहे. या शिष्टमंडळामध्ये अनिल जाधवर, श्रीराम बहिर, राजेंद्र खेडकर, सुधाकर सावंत, हरिदास घोगरे, बाबुराव नागरगोजे हे सहभागी होते.

## नगरसेवक जैतुल्ला खान यांना बीड नगरपालिकेचा उपाध्यक्ष पद द्यावेत : पठाण नझीर खान लाला

**बीड । प्रतिनिधी**

नगरसेवक जैतूल्ला खान हे मागील पंचवीस वर्षांपासून समाज सेवक म्हणून बीड शहरातील व जिल्ह्य़ातील सर्व समाजातील गोर गरीब लोकांचे रात्र दिवस काम करतात. जैतूल्ला खान मागील पंधरा वर्षांपासून नगरपालिकेत निवडून येत आहेत. जैतूल्ला खान यांचे काम तहसील कार्यालय, दवाखान्यात, पोलीस स्टेशन व रात्र दिवस लोकांचे सुखात कमी दुखात जास्त वेळ देत असल्या मुळे लोकांनी त्यांना गरीबांचा लोकप्रिय आहेत म्हणून भरपूर मताधिक्यनी निवडून दिले.




जैतूल्ला खान हे पठाण समाजातील असल्याने त्यांना बीड नगरपालिकेत उपाध्यक्ष पद दिल्याने बीड शहरातील पठाण समाज बहुसंख्याक असल्यामुळे पठाण समाजाला न्याय भेटतील. पठाण समाजातील नेते रूस्तम खान पठाण हे बीड नगरपालिकेत उपाध्यक्ष होते. रूस्तम खान काका हे शरदचंद्र पवार साहेबांचे विश्वासू कार्यकर्त्ये होते. त्यामुळेच बीड शहरातील सर्व पठाण समाज बांधव शरदचंद्र पवार साहेब व आजितदादा पवार साहेबा सोबत एकनिष्ठ आहेत.

जैतूल्ला खान यांना बीड नगरपालिकेत उपाध्यक्ष दिल्यास पठाण समाजाला न्याय मिळेल. यासाठी नझीर खान लाला मा.ऊपमुखयमंत्री अजित दादा पवार साहेब, बीड जिल्हाध्यक्ष चव्हाण साहेब, आमदार विजयराजे पंडित व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकाऱ्यांना भेटून विनंती करनार.

## पाटोदा येथील गट क्र. ७१५ मधील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश; प्रशासनाकडून कारवाईला वेग

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे पाटोदा येथील गट क्रमांक ७१५ मधील शासकीय गायरान जमिनीवर झालेली अतिक्रमणे सहा महिन्यांच्या आत निष्कासित करण्याचे आदेश माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय आणि स्थानिक प्रशासनाने आता प्रत्यक्ष कारवाईसाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, क्रांतीनगर येथील रहिवासी शेख मोबीन हमीद यांनी ड नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्यामार्फत माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका (झखङ छे. २७/२०२५) दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याचे निर्देश दिले होते. सुरुवातीला तांत्रिक कारणास्तव आदेशात गट क्रमांक ७१५ ऐवजी १७५ अशी नोंद झाली होती. मात्र, अर्जदाराने ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, जिल्हाधिकारी कार्यालयाने सुधारित गट क्रमांक ७१५ नुसार कारवाई करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.

मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या १६ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार आणि त्यानंतरच्या १ जानेवारी २०२६ च्या स्मरणपत्रानुसार, आता प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. न्यायालयाने दिलेल्या ६ महिन्यांच्या मुदतीत ही कारवाई पूर्ण करणे अनिवार्य असल्याने संबंधित ७१५ गट क्रमांकातील सर्व अतिक्रमणधारकांची ओळख पटवून त्यांना नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. उच्च न्यायालयाच्या अवमाननेची कारवाई टाळण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाला 'अत्यंत तातडीचे' म्हणून प्राधान्य दिले आहे. महसूल अभिलेखातील गट क्रमांकाच्या दुरुस्तीसह प्रत्यक्ष जागेची मोजणी करून अतिक्रमण क्षेत्र निश्चित केले जाणार आहे. या निर्णयामुळे पाटोदा परिसरातील गायरान जमिनी बळकावणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासकीय यंत्रणा कधी प्रत्यक्ष बडगा उगारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'बीड न्यूज आपतक'च्या बेधडक पत्रकारितेचा मान्यवरांकडून गौरव!
### दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त बीडमध्ये मान्यवरांची उपस्थिती; सत्याची कास न सोडण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते, आणि हा स्तंभ तेव्हाच मजबूत राहतो जेव्हा पत्रकार सत्तेला आणि नेत्यांना थेट प्रश्न विचारण्याचे धाडस करतो. एक कदम सच की ओर हे ब्रीदवाक्य घेऊन वाटचाल करणाऱ्या 'बीड न्यूज आपतक या हिंदी न्यूज चॅनलने अवघ्या दोन वर्षांत ही किमया साधली आहे. चॅनलच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी मुख्य संपादक शेख इमरोज शरीफ यांच्या 'नेत्यांना घाम फोडणाऱ्या' बेधडक पत्रकारितेचे विशेष कौतुक केले.

बीड येथे अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्याला माजी आमदार उषाताई दराडे, संगीता वाघमारे, आम्रपाली साबळे, माजी पंचायत समिती सदस्य पठाण फेरोज, समाजसेवक सय्यद फैयाज भाई, अॅड. शेख झेबा, शेख कदीर, नगरसेवक अयूब खान, नगरसेवक मोमिन मोसीन, ग्रामपंचायत सदस्य सय्यद रहीम, ग्रामपंचायत सदस्य सय्यद नदीम मंडोला, ग्रामपंचायत सदस्य सय्यद रिजवान, माजी नगरसेवक सय्यद फारूक, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख इंजि.कृष्णा चौरे, शेख अनिस सर, राणी बाजी, रेहान बाजी, शिक्षिका शबाना बाजी, ज्येष्ठ पत्रकार एस.एम युसुफ साहेब, हाफिस मन्सूर, सय्यद



साजेद, गुड्डू चाऊस, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, सय्यद सादिक, एसडीपीआय पक्षाचे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष सय्यद आबेद, स्टार नॅचरा ग्रुपचे डॉक्टर सेल पदाधिकारी, जिव्हाळा बेघर केंद्राचे अभिजीत वैद्य, डॉ. राजेंद्र सानप, बीड शहर बचाव मंचचे डी.जी तांदळे, नितीन जायभाय, पत्रकार बाजीराव ढाकणे, नसीर पटेल, पत्रकार एजाज अहमद, पठाण जावेद सर यांच्यासह शहरातील अनेक दिग्गजांनी हजेरी लावली.

यावेळी बोलताना मान्यवरांनी शेख इमरोज शरीफ यांच्या कामाचा गौरव केला. ते म्हणाले की, सध्याच्या काळात अनेकदा पत्रकार प्रश्न विचारताना कचरतात, पण 'बीड न्यूज आपतक'ची शैली वेगळी आहे. समोर नेता कोणताही असो, कोणताही मुलाहिजा न बाळगणारी आणि थेट, तिखट प्रश्न विचारण्याची या चॅनलची धमक वाखाणण्याजोगी आहे. आपल्या थेट प्रश्नांमुळे चांगल्या चांगल्या नेत्यांना घाम फोडण्याचे काम शेख इमरोज यांनी केले आहे. हीच खरी निष्पक्ष पत्रकारिता आहे आणि आज समाजाला अशाच निडर पत्रकारांची गरज आहे. इतर पत्रकारांनीही कोणाच्याही दबावाला बळी न पडता अशाच प्रकारे काम करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

निवडणूक रणधुमाळीतही शुभेच्छांचा ओघ सध्या सुरू असलेल्या दुसऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे बीडमधील अनेक नेतेमंडळी प्रचारार्थ बाहेरगावी आहेत. व्यस्त वेळापत्रकामुळे ज्यांना या सोहळ्याला प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही, त्यांनी फोनवरून आणि मेसेजद्वारे शुभेच्छांचा वर्षाव केला. काही नेत्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून 'तुम्ही असेच पुढे जा, आमचा आशीर्वाद सदैव पाठीशी आहे' अशा भावना व्यक्त केल्या.

शहरात एकाच दिवशी अनेक कार्यक्रम असल्याने काही मान्यवरांना या सोहळ्याला पोहोचण्यास विलंब झाला. मात्र, उशिरा का होईना, त्यांनी आवर्जून उपस्थिती लावली. कार्यक्रमाला उशीर झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत त्यांनी शेख इमरोज यांची भेट घेतली आणि सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास आजी-माजी नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी आणि चॅनलचे दर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शहरातील अनेक पत्रकार बांधवांनी उपस्थित राहून या आनंदाच्या क्षणाचे साक्षीदार झाले. सदरील कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी आपतक मित्र परिवाराने अथक मेहनत केली.

# मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात

# सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण

## सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने : डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात २०२५ या वर्षात एकूण ११२९ शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत मरणाला कवटाळले आहे. मागील दोन वर्षांपासून बीड जिल्हा मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये आघाडीवर असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. शासन व प्रशासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण या घोषणेच्या निषेधार्थ आज शुक्रवार दि.९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण घोषणाबाजी करत जोरदार निदर्शने करण्यात आली.

ही निदर्शने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी आंदोलकांनी सरकार व प्रशासनाने केवळ फोटोसेशनपुरते मर्यादित न राहता शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी ठोस व परिणामकारक पावले उचलावीत अशी ठाम मागणी केली. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे (जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना) शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, सुहास जायभाये, माहिती आधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, गणेश नाईकवाडे (जिल्हाध्यक्ष मराठा महासंघ), प्रा.डी.जी.तांदळे (अध्यक्ष म.रा.किसानसभा जि.बीड, प्रा.राजकुमार यादव, डॉ.संजय तांदळे आदी सहभागी होते.

मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांची मालिका सुरूच असून, त्यामागे कर्जबाजारीपणा, नापिकी, सावकारांचा विळखा, शेतीमालाला योग्य भाव न मिळणे, तसेच प्रशासनाची उदासीनता ही प्रमुख कारणे आहेत. २०२४ मध्ये मराठवाड्यात ९८४ शेतकरी आत्महत्या झाल्या होत्या, तर २०२५ मध्ये हा आकडा वाढून ११२९ वर पोहोचला आहे. यावर्षी मराठवाड्यावर आसमानी संकट कोसळल्याने ४० लाख हेक्टरपेक्षा अधिक शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला आहे. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत.

सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण ठरत असून, प्रशासन व राजकीय पुढाऱ्यांनी निव्वळ दिखाऊ उपाय न करता शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठोस धोरणे तात्काळ राबवावीत, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी आंदोलनात विविध सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांच्या पुढाकाराने जिल्हा रुग्णालय परिसर स्वच्छ

## मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेत दिले स्वच्छतेचे आदेश



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालय परिसरात तसेच मुख्य रस्त्यावर साचलेली अस्वच्छता, कचरा व दुर्गंधी यामुळे रुग्ण, नातेवाईक आणि नागरिक त्रस्त झाले होते. आरोग्याच्या दृष्टीने गंभीर असलेली ही बाब सामाजिक क्षेत्रात सक्रीय असलेले राजू इनामदार यांनी तात्काळ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. राजू इनामदार यांनी मुख्याधिकाऱ्यांना फोन करून जिल्हा रुग्णालय परिसरातील अस्वच्छतेची सविस्तर माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी त्वरित संबंधित विभागाला आदेश देत संपूर्ण परिसर स्वच्छ करण्याच्या सूचना दिल्या.

प्रशासनाच्या तत्पर प्रतिसादामुळे काही वेळातच रुग्णालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. साचलेला कचरा हटवून परिसर धुतला गेला तसेच स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यात आले. यामुळे रुग्ण व नागरिकांनी समाधान व्यक्त केले. सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने आवाज उठवणारे राजू इनामदार यांच्या पुढाकारामुळे जिल्हा रुग्णालय परिसर पुन्हा एकदा स्वच्छ झाला असून, त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना लोकरत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांना बाळशास्त्री जांभेकर या दर्पण दिनानिमित्त सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन व लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांचे काम अतिशय उत्कृष्ट असल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीला हद्दपार करणारे एकमेव एसपी म्हणून नवनीत कावन साहेब यांच्याकडे सध्या जिल्हावासीय पाहत आहेत. म्हणून त्यांचे कार्य अप्रतिम उत्कृष्ट आहे, म्हणून त्यांना महाराष्ट्रा राज्य लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला तसेच बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान साहेब यांचे देखील जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कर्तव्य अतिशय उल्लेखनीय कार्य आहे.

कारण जिल्हा परिषदेचा चार्ज घेतल्यापासून अनेक काम-कुचार अधिकाऱ्यावर तसेच जिल्हा परिषदेमध्ये विविध विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील त्यांनी निलंबनाच्या कारवाया केल्या आहेत. तसेच वेळोवेळी पंचायत समिती असो की जिल्हा परिषदेमधील अनेक विभाग असो अशा जिल्हा परिषदेमधील विविध विभागावर त्यांचे सातत्याने कडक नियंत्रण असते. बीड जिल्हा परिषद आता एक उत्कृष्ट कार्य चांगल्या प्रकारे या जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कामकाज चालत असल्यामुळे सर्व बीड जिल्ह्यातील जनतेमधून आनंद व्यक्त होत आहे. या महत्त्वाच्या अधिकाऱ्याचा देखील लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान सर यांना देखील सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेला लाभलेले इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंडेवाड साहेब यांना देखील लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी येथे उपस्थित असलेले श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य साहेब, प्रा. दत्ता रामरुले, माजी नगरसेवक बाबुराव परळकर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी, हे यावेळी उपस्थित होते.

# बीडची रेल्वे पेक्षा जत्रेतली रेल्वे बरी

## रेल्वेला गती कधी मिळेल : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे उद्घाटन १७ सप्टेंबर २०२५ रोजी झाले. १६६ किलोमीटर रेल्वेचे काम पूर्ण झाले पण या रेल्वेला बीड ते अहिल्यानगर जाण्यासाठी सहा ते सात तासाचा प्रवास करावा लागत आहे. रेल्वेला गती कधी मिळेल? त्यासाठी आत्तापर्यंत १२८६ कोटी खर्च झालेले असून रेल्वे मात्र १७ स्टॉप घेऊन त्यात अजून फाकट उघडण्यासाठी रेल्वेच्या कर्मचाऱ्याला उतरून ते परत लावावे लागत आहे. तर यापेक्षा जत्रेतली रेल्वे बरी असेच म्हणावे लागेल.

चाळीस वर्षाच्या कालावधीनंतर बीड ला रेल्वे येवूनही प्रवासाला काहीच उपयोग झालेला नाही. कारण तिथे जाण्यासाठी रिक्षावाले दीडशे ते दोनशे रुपये घेतात. त्यात रेल्वे स्टेशनची काय अवस्था झाली याकडे पण प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. असे दिसून येत आहे. कोणी लक्ष देत नाहीं. नागरिकाकडून बोलले जात आहे की रेल्वे येऊन उपयोग काय? यापेक्षा तर जत्रेतील रेल्वे बरी.

# कर्तृत्ववान नगरसेवक हातिम भैय्या यांचा वाढदिवस उत्साहात; 'फैजान युवा मंच' कडून शुभेच्छांचा वर्षाव

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या धडाडीच्या कामातून आणि जनसंपर्कातून जनमानसात अढळ स्थान निर्माण केलेले कर्तृत्ववान नगरसेवक हातिम भैय्या यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.'फैजान युवा मंच'कडून जंगी स्वागत हातिम भैय्या यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून फैजान युवा मंच तर्फे त्यांचे विशेष अभीष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी मंचचे प्रमुख फैजान सौदागर यांच्यासह शेख शारेक, अयान पटेल, अफान मोमीन, तोसिफ प्रिन्स, हुजेफ सय्यद आणि हुजेफ शेख यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन हातिम भैय्या यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी बोलताना फैजान सौदागर म्हणाले



की, हातिम भैय्या हे केवळ नगरसेवक नसून तरुणांचे प्रेरणास्थान आहेत. प्रभागातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट आणि सामान्यांच्या हाकेला धावून जाण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद आहे.या कार्यक्रमाप्रसंगी फैजान युवा मंचचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे हा वाढदिवस सोहळा स्मरणीय ठरला.

# नगरसेवक अफसर शेख ॲक्शन मोडमध्ये; प्रभाग क्रमांक २४ मध्ये स्वच्छता मोहीम फत्ते

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक २४ चे नगरसेवक अफसर शेख यांनी आपल्या प्रभागातील समस्यांची दखल घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. मोमीनपुरा भागातील साचलेला कचरा आणि तुंबलेल्या गटारींची समस्या मार्गी लावण्यासाठी त्यांनी स्वतः उपस्थित राहून मोठी स्वच्छता मोहीम राबवली. प्रभाग क्रमांक २४ मधील मोमीनपुरा परिसरात गेल्या काही दिवसांपासून गटारी तुंबल्याने आणि कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. ही बाब लक्षात येताच नगरसेवक अफसर शेख यांनी तातडीने पावले उचलली. त्यांनी नगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना पाचारण करून संपूर्ण प्रभागाची पाहणी केली. केवळ सूचना देऊन न थांबता, अफसर शेख यांनी स्वतः प्रभागातील विविध गल्लीबोळांत उभे राहून तुंबलेल्या गटारी कर्मचाऱ्याकडून उपसून घेतल्या. तसेच ठिकठिकाणी साचलेला कचरा घंटागाडीद्वारे उचलून परिसर चकाचक केला. लोकप्रतिनिधी स्वत रस्त्यावर उतरून काम करून घेत असल्याचे पाहून नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नगरसेवकांच्या या तत्परतेमुळे मोमीनपुरा परिसरातील दुर्गंधी दूर झाली असून नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. आपल्या प्रभागाच्या लोकप्रतिनिधीने अशाच प्रकारे सक्रिय राहून काम करावे, अशी भावना व्यक्त करत परिसरातील नागरिकांनी अफसर शेख यांचे भरभरून कौतुक केले आहे.



# कुक्कडगाव चे भुमिपुत्र कृषी उत्पन्न बाजार समिती बीड चे सचिव यशवंत कदम यांचा सेवापुर्ती निमित्ताने सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे कुक्कडगाव चे भुमिपुत्र कृषी उत्पन्न बाजार समिती बीड चे सचिव यशवंत राणाप्रताप कदम पस्तीस वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर शासन सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याबद्दल महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य आणि लेक लाडकी अभियान यांच्या वतीने सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी दैनिक आत्ताचा एक्स्प्रेस जिल्हा प्रतिनिधी किशोर देवा कुलकर्णी, साप्ताहिक संघर्ष यात्रा चे संपादक आत्माराम वाव्हळ, महा एनजिओ फेडरेशनचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, प्रकाश गाढे, पत्रकार संजय कुलकर्णी, कुक्कडगाव ग्रामपंचायत सदस्य आत्माराम प्रभाळे, चंद्रकांत नवले, सोनवणे मॅडम, भागवत वैद्य, तुळशिदास पवार, सुदाम आरेकर, महा एनजीओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

बीड तालुक्यातील मौजे कुक्कडगाव येथील भुमिपुत्र यशवंतराव राणाप्रताप कदम शासकीय सेवेतुन प्रदिर्घ काळानंतर सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सत्कार आणि सन्मान महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य आणि लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित केला होता.

# धम्मध्वज दिनानिमित्त माजलगावात शांती-करुणेचा जागर

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे जागतिक बौद्ध धम्मध्वज दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व शांततामय वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम धम्म उपासक प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सभासद दीपक भालेराव सर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर धम्मध्वजाचे पूजन करण्यात आले. धम्मध्वज हा शांती, करुणा, मैत्री, समता व प्रज्ञेचे प्रतीक असून तो मानवतेचा वैश्विक संदेश देतो, असे उपस्थितांना सांगण्यात आले.

या कार्यक्रमास सदधम्म सेवा संघाचे सभासद तसेच बहुसंख्य उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ॲड. दशरथ मकसरे, भगवानराव सातपुते, गौतम घनघाव, नवनाथ शिनगारे, रविकांत उघडे, प्रभाकर साळवे, सागर सातपुते, प्रशांत सातपुते, विक्रांत चांदमारे, भीमराव कांबळे, सिद्धार्थ



ढवळे, नालंदाताई भालेराव व वंदनाताई शिनगारे हे प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी भिक्खू धम्मशील थेरो यांनी जागतिक धम्मध्वज दिनाचे महत्त्व विशद करणारे प्रभावी प्रवचन केले. आजच्या सामाजिक तणाव, द्वेष व असमानतेच्या पार्श्वभूमीवर भगवान बुद्धांचा धम्म हा शांती, नैतिकता व मानवतावादी जीवनमूल्यांचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. दान, शील व प्रज्ञेच्या आचरणातून व्यक्ती व समाजाचे सकारात्मक परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमातून दानशीलता, समभाव व सामूहिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित उपासक-उपासिकांनी धम्म आचरणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध व धम्ममय वातावरणात पार पडला. अशा उपक्रमांमुळे समाजात बंधुता, सद्भावना व नैतिक मूल्ये अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# द मिडीया व्हॉईस पत्रकार संघाचे कार्य कौतूकास्पद : अनिल कटके

**गेवराई । प्रतिनिधी**

संपुर्ण महाराष्ट्र भरात आज आचार्य बाळसास्त्री जांभेकर यांचा स्मृतीदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो तसेच अनेक पत्रकार बांधव हा दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करतात तसेच याच दर्पण दिनानिमित्त द मिडीया व्हॉईस पत्रकार संघाने मंतिमंद ५० विद्यार्थी यांना गणवेश वाटप करून साजरा केला आहे. या कार्यक्रमाला संबोधित करताना गेवराई उपविभागाचे पोलिस उपविभागीय अधिकारी अनिल कटके म्हणाले की गेवराईत द मिडीया व्हॉईस पत्रकार संघाने अतिषय कौतूकास्पद आहे तसेच खऱ्या गरवतांना आधार देण्याचे काम या पत्रकार संघाचे आहे असे मत मा नगर अध्यक्ष महेश दाभाडे यांनी मांडले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दर्पण दिना निमित्त कै भगवाराव ढोबळे मुकबधिर व मंतीमंद निवासी विद्यालय याठिकाणी असणाऱ्या ५० विद्यार्थी यांना शालेय गणवेश




व खाऊचे वाटपाचा कार्यक्रम आज (दि.६ जानेवारी) रोजी वरील ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपिठावर गेवराई उप विभागाचे उपविभागीय अधिकारी अनिल कटके, माजी नगर अध्यक्ष महेश दाभाडे, शिवसेना (शिंदे गट) उद्धव मडके, द मिडीया व्हॉईस अध्यक्ष अविनाश इंगावले, उपाध्यक्ष सूभाष शिंदे, कार्यध्यक्ष शेख जावेद सर, सचिव सोमनाथ मोटे, विनोद पौळ, भागवत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच या कार्यक्रमाला सबोधित करतांना उप विभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके म्हणाले की दर्पण दिन हा पत्रकार यांचा आहे मानाचा उत्सव आहे त्यांनी लोकशाही बळकट ठेवली व वेळोवेळी कायद्याचे भान ठेवून आदर्श पत्रकारीता या द मिडीया व्हॉईस पत्रकार संघाने केली तसेच समाजाती वंचित घटक असलेल्या या विद्यार्थी यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला व कौतूकास्पद कामगिरी केली असल्याने अतिषय चांगला उपक्रम राबवला असून यांचे कार्य माझ्या हातून घडले यांचा मला मनस्वी आनंद असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले तसेच गेवराईचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आज दर्पण दिन आहे. हा लोकशाही ने दिलेला चौथ्या आधार स्तंभाचा उत्सव आहे. आपण हा साजारा केला पाहिजे द मिडीया व्हॉईस पत्रकार संघाने गरजू व खऱ्या समाजतील घटकांना न्याय देण्याचं काम केले आहे व आधार देण्याचा त्यांचा संक्लप चांगला आहे. यानिमित्ताने सर्व पत्रकार बांधव यांना दर्पण दिनाच्या त्यांनी सुभेच्छा दिल्या तसेच याठिकाणी सय्यद बादशाह, शेख फेरोज, शेख जफर, शेख अन्सार, शेख खाजा, शेख अफसर, अमोल भांगे, देवराज कोळे, गणेश ढाकणे, ईम्राण सौदागर, सुभम घोडकेसह अनेक पत्रकार बांधव उपस्थित होते.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता, परळी वै, जि, बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून **साप्ताहिक विश्वनायक** कार्यालय, खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील)** मो. 8686888898 ई-मेल- vishvanayak94gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the weekly. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com